म. ग्रं. सं. ठाणें
वि.य
सं. क्र. ९१४९
१४२६
REFBK-0003053

म. ग्रं. सं. टाणें
विषय
क्र. नं.

मत्र पुस्तकमाला.

नक विसावें.

# थोरांचें बालपण.

## भाग पहिला.

लेखक व प्रकाशक
**पारुजी नारायण मिसाळ,**
बालसन्मित्र–कार्यालय, मालवण.

मुद्रक
**गोपाळ बळवंत जोशी,**
आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणे.

जून १९२६.

REFBK-0003053

( सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

काल्पनिक गोष्टी कितीही चटकदार व बोधप्रद असल्या तरी खऱ्याखुऱ्या घडलेल्या गोष्टींची किंमत त्यांहून निःसंशय अधिक आहे, हें कोणीही कबूल करील. थोरांचीं चरित्रें ऐकून त्यांचें बालपण कसें काय गेलें असेल, अशी जिज्ञासा साहाजिकच मनांत उत्पन्न होते. या करितां निरनिराळ्या काळींच्या व स्थळींच्या थोर स्त्रीपुरुषांच्या बालपणांतील मनोरंजक व बोधप्रद गोष्टी एकत्र गुंफून हें '**थोरांचें बालपण**' माझ्या बालमित्रांच्या हातीं देत आहें. माझा हा प्रयत्न त्यांना पसंत पडल्यास या पुस्तकाचे पुढील भागही सवडी सवडीनें **बालसन्मित्रमालेंतून** प्रसिद्ध करीन.

बालसन्मित्र—कार्यालय,
मालवण १।१।६।२६.

**पा. ना. मिसाळ.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| थोरांचें बालपण काय शिकवील ? | १ |
| १ गौतमबुद्ध ... ... | ३ |
| २ श्री शिवाजी महाराज | ६ |
| ३ शिकंदर बादशाहा ... | १२ |
| ४ महादेव गोविंद रानडे | १४ |
| ५ महाराणी व्हिक्टोरिआ | १९ |
| ६ मोहनदास करमचंद गांधी | १६ |
| ७ नेल्सन ... ... | २० |
| ८ स्वामी विवेकानंद ... | २१ |
| ९ जेम्स गार्फील्ड ... | २२ |
| १० गोपाळ कृष्ण गोखले | २४ |
| ११ प्रिन्स बिस्मार्क ... | २५ |
| १२ आल्फ्रेड दि ग्रेट ... | २७ |
| १३ हरी नारायण आपटे ... | २८ |
| १४ जोसेफ माझिनी ... | ३० |
| १५ राजा राममोहन राय .... | ३१ |
| १६ जॉर्ज वाशिंग्टन ... | ३३ |
| १७ श्रीधर गणेश जिन्सीवाले | ३५ |
| १८ शेखसादी ... ... | ३८ |
| १९ रामचंद्र विठोबा धामणस्कर | ४० |
| २० बेंजामिन फ्रांक्लिन ... | ४२ |
| २१ देवी अहिल्याबाई होळकर | ४१ |
| २२ रामकृष्ण गोपाळ भांडारकर | ४७ |

# थोरांचें बालपण.

## थोरांचें बालपण काय शिकवील ?

बालमित्रांनो, आज तुमचें बालपण आहे. पण हें बालपण असेंच कायम राहावयाचें नाहीं. तुम्ही आज लहान आहां ते हळुहळु मोठे व्हाल. आज जीं जगांत मोठीं माणसें तुमच्या नजरेसमोर दिसत आहेत किंवा पूर्वीं जीं मोठीं माणसें होऊन गेलीं, तीं सर्व तुमच्या सारखींच लहान होतीं. राजा असो, विद्वान् असो, अविद्वान् असो, कोणीही असला, तरी त्याला बालपण हें असतेंच. तीं माणसें एकदमच कांहीं मोठीं झालेलीं नसतात.

ज्या प्रमाणें आजचीं मोठीं माणसें हीं पूर्वीं बाल्यावस्थेंत होतीं, त्या प्रमाणेंच तुम्हींही आज जरी बाल्यावस्थेंत आहां तरी नेहमीं तुमची बाल्यावस्था राहाणार नाहीं. आजचे ‘ बाल ’ हेच पुढें ‘ थोर ’ व्हावयाचे आहेत. तुम्ही कोणतीही खटपट केल्यावांचून प्रत्येक दिवशीं थोडथोडे वाढत आहां. वयोमानाप्रमाणें प्रत्येक मनुष्य बालपणांतून तारुण्यांत व तारुण्यांतून वृद्धावस्थेंत जात असतो. त्याप्रमाणें तुम्हींही हळुहळु या स्थितींत जाल.

मनुष्याचें वय आपोआप वाढत असतें. त्याला निराळी खटपट करावी लागत नाहीं. परंतु थोरपणा हा केवळ वयावर अवलंबून नसतो वयानें थोर तो खरा थोर नव्हे. योग्यतेनें थोर, तोच खरा

थोर होय. सगळींच माणसें वयानें थोर होतात, पण योग्यतेनें थोर व्हावयाचें असेल तर तशी कर्तबगारी करून दाखविली पाहिजे. एरवीं फुकटचा थोरपणा मिळत नाहीं.

जगांत कोट्यवधि माणसें जन्मास येतात आणि मरतात. त्यांचें नांवही कोणी घेत नाहीं. परंतु थोर माणसांची कीर्ति अजरामर असते. त्यांचें नांव पुष्कळ लोकांस माहित असतें. त्यांची कीर्ति सर्वत्र पसरलेली असते. त्यांचीं चरित्रें समजून घेण्याची इच्छा पुष्कळांना होते.

माझ्या बालमित्रांनो, आजपर्यंत जीं मोठमोठीं माणसें जगांत होऊन गेलीं, त्यांचें बालपण कसें काय गेलें असेल? असा प्रश्न तुमच्या मनांत आल्यास नवल नाहीं. त्याच प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं या पुस्तकांत कांहीं थोर माणसांच्या बालपणच्या गोष्टी निवडून मी तुम्हांला सांगण्यासाठीं घेऊन आलों आहे. त्या गोष्टी वाचून तुम्हांला मोठी मौज वाटेल. आज जरी हीं थोर माणसें म्हणून गणलीं जात आहेत, तरी आपल्या सारखींच तीं पूर्वीं लहान मुलें होतीं. आपल्यासारख्याच चुका त्यांजकडून होत होत्या. हें निरनिराळ्या गोष्टींवरून तुम्हांला समजून येईल.

निरनिराळ्या गोष्टींवरून निरनिराळा बोध तुम्हांला मिळावा, थोर माणसांप्रमाणें आपणही पुढें थोर होण्याचा प्रयत्न करावा, त्यांच्या सारखी कीर्ति मिळवून आपलें नांव अजरामर करावें, असें तुमच्या मनांत यावें आणि तशी कांहीं कर्तबगारी करण्याचा निश्चय तुम्ही आजच्या वयांतच करावा हें योग्य होय. 'थोरांचें बालपण' पहावयाचें तें याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे.

# दयाळू बालक.

## गौतमबुद्ध.

[ बुद्धधर्मसंस्थापक. ]

सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीं हिमालयाच्या पायथ्यास कपिलवस्तु नांवाचें एक राज्य होतें. तेथें शुद्धोदन नामक राजा राज्य करीत होता. त्या राजाच्या पुत्राचें नांव सिद्धार्थ.

एके दिवशीं राजपुत्र सिद्धार्थ आपल्या बालवयी संवगड्यांबरोबर मैदानांत खेळत होता. इतक्यांत आकाशांतून हंसांचा एक कळप उडून जात असलेला त्या मुलांच्या नजरेस पडला. मुलांना त्यांची गंमत वाटून तीं आपला खेळ सोडून त्या हंसांकडे पाहूं लागलीं. तेव्हां सिद्धार्थ आपल्या बालमित्रांस म्हणाला, "गड्यांनो, पाहिलेंत ना? हे हंस कसे आनंदप्रद शब्द करीत मोठ्या मौजेनें उडून चालले आहेत. आम्हां मनुष्यांप्रमाणें त्यांनाही सुखदुःख आहे. आज या हंसांना कांहीं तरी सुख झालें असलें पाहिजे, म्हणूनच ते आनंदकारक ध्वनि करीत असावेत." इतकें सिद्धार्थ बोलत आहे, तों त्या कळपांतील एक हंस दीन स्वरानें ओरडत खालीं पडत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला! हां हां म्हणतां तो हंस भूमीवर येऊन पडला, तेव्हां सिद्धार्थ आणि त्याचे सोबती त्याजजवळ धांवत गेले.

सिद्धार्थानें जवळ जाऊन पाहिलें तों त्या हंसाला कोणाचा तीर लागून व्याकूळ होऊन तो खालीं पडला आहे, त्याचें सर्वांग रक्तबंबाळ

झालें आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां राजकुमाराचें अंतःकरण कळवळलें आणि चटदिशीं त्यानें त्या हंसास उचलून आपल्या हातीं घेतलें. नंतर त्याच्या अंगात खुपसलेला तो तीर त्यानें हलकेच उपसून काढिला आणि थंड पाणी घेऊन त्या पक्ष्याची जखम धुतली राजकुमाराच्या प्रेमळ उपचारानें तो हंस थोड्याच वेळांत सावध झाला.

सिद्धार्थ राजपुत्र होता. त्याला कधीं कांटाही बोंचलेला नव्हता. तेव्हां तीर बोंचल्यानें त्या गरीब बिचाऱ्या पक्ष्यास किती वेदना झाल्या असतील, याची यथार्थ कल्पना येण्याकरितां त्या बहाद्दरानें तोच तीर आपल्या बाहूंत खुपसला! तेव्हां हात रक्तबंबाळ होऊन भयंकर वेदना होऊं लागल्या. त्यावेळीं डोळ्यांत अश्रु आणून रडत रडत तो म्हणाला, "गरीब बिचाऱ्या पांखराला कोणी निर्दयानें हा बाण मारून दुःख दिलें असेल तें असो, पण हें त्यानें फारच वाईट कृत्य केलें आहे. अरेरे! गरीब बिचारा प्राणी!"

इतकें होत आहे, तों सिद्धार्थाचा चुलतभाऊ देवदत्त हातीं धनुष्य घेऊन त्याचेकडे धांवत आला. देवदत्त सिद्धार्थाचा भाऊ खरा पण सिद्धार्थाप्रमाणें तो दयाळू नसून मोठा निर्दय होता. त्यानेंच आपल्या धनुष्यानें बाण मारून त्या हंसाला खालीं पाडलें होतें. तो सिद्धार्थाजवळ येऊन उभा राहिला आणि म्हणाला, "अरे, वा रे वा! तूं माझी शिकार घेतली आहेस काय? मी उगीच चोंहीकडे शोधीत फिरत होतों. मी स्वतां बाण सोडून हा हंस खालीं पाडला आहे, याकरितां माझा हंस तूं मला दे." त्याचें भाषण ऐकून सिद्धार्थ म्हणाला, "छे छे, मी त्याचें प्राणरक्षण केलें आहे. तो

मी तुजकडे देणार नाहीं. तुझ्याजवळ दिल्यास तूं त्याचा प्राण घेशील." देवदत्त जरा रागानें म्हणाला, "माझ्या हंसाचा मी प्राण घेईन, नाहींतर वाटेल तें करीन. माझ्या तीरानें तो खालीं पडला आहे, अर्थात् त्यावर हक्क माझा आहे." सिद्धार्थानें म्हटलें, "बंधो, कांहीं असलें तरी हा हंस मी तुला देणार नाहीं. कदाचित् हा पूर्वींच मेला असता तर तो मी तुला दिला असता. तूं त्याला अतिशय दुःख दिलें आहेस. मीं त्याचे प्राण वांचविले आहेत, तेव्हां हा हंस मी तुझ्या स्वाधीन मुळींच करणार नाहीं." शेवटीं देवदत्त म्हणाला, "अशानें आपलें भांडण कांहीं मिटणार नाहीं, आपण दोघेजणही राजसभेंत जाऊं." सिद्धार्थाला हें म्हणणें पटून ते दोघेजण राजसभेंत गेले.

राजसभेंत गेल्यावर दोघांनींही आपापलें म्हणणें काय होतें तें सांगितलें. तेव्हां राजसभेंत कित्येकांना देवदत्ताचें म्हणणें बरोबर वाटलें, परंतु पुष्कळजणांस सिद्धार्थाचेंच म्हणणें बरोबर वाटून त्याच्या तर्फें न्याय झाला! तेव्हां सिद्धार्थ मोठ्या आनंदानें तो हंस घेऊन आपल्या घरीं आला आणि त्यानें त्या हंसाची उत्तम तऱ्हेनें जोपासना केली.

'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' अशी म्हण आहे, तिचा अर्थ हाच कीं, जो गुण लहानपणीं असतो तोच थोरपणीं वाढतो. सिद्धार्थानें नऊ दहा वर्षांच्या अल्पवयांत हंसासंबंधानें जो दयाळूपणा दाखविला तोच दयाळूपणा आमरण त्यानें दाखविला. तो राजपुत्र होता आणि त्याला अनायासें राज्यप्राप्ति झाली असती, परंतु राजवैभवाचें सुख त्याला चांगलें वाटलें नाहीं. त्यानें भर तारुण्यांत

सर्वसंग परित्याग करून संन्यास घेतला. प्राणिमात्राचीं दुःखें नाहींशी करण्याकरितां बौद्धधर्माची स्थापना केली. बौद्धधर्मांत अहिंसा हा श्रेष्ठ धर्म असें सांगितलेलें आहे.

---

# बाल शिवाजींची तेजस्विता.

## श्रीशिवाजी महाराज.

[ मराठी राज्याचे संस्थापक. ]

शिवाजी महाराजांचे वडील विजापूरच्या बादशाहाच्या पदरीं नोकरीस होते, हें सर्वांस माहीतच आहे. एकदां शिवाजी महाराज आपल्या वडिलांकडे विजापुरीं गेले असतां पुढें लिहिलेली गोष्ट घडून आली.

एके दिवशीं शहाजींचे मित्र मुरार जगदेव यांनीं बादशाहापुढें छोट्या शिवाजी महाराजांची फार प्रशंसा केली. महाराजांचें वय या वेळीं अवघें तेरा चौदा वर्षांचें होतें. मुरार जगदेवांनीं केलेली तारीफ ऐकून या बाल शिवाजींना पाहण्याची इच्छा बादशाहास झाली आणि त्यांना भेटीस आणण्याविषयीं त्यानें मुरार जगदेवास सांगितलें.

बादशाहाचा हुकूम झाल्यावर तो अमान्य कोण करणार ? परंतु मुसलमान लोकांसंबंधानें, त्यांच्या एकंदर वागणुकीसंबंधानें शिवाजी महाराजांस या बालवयांतच अतिशय तिटकारा वाटत असे. त्या

मुळें त्यांनीं बादशाहाच्या भेटीस जाण्याचें साफ नाकारिलें. ते म्हणाले, " मी यवनांच्या दरबारीं मुळींच येणार नाहीं. कारण ते आमच्या हिंदु धर्माची निंदा करितात; आम्ही पवित्र मानिलेल्या गोमातेचा वध करितात; त्यामुळें मला त्यांचा अतिशय तिटकारा येतो." बादशाहानें त्यांना आणण्याविषयीं सांगितलें होतें, आणि शिवाजी महाराजांनीं तर असें चक्क उत्तर दिलें! पुष्कळांनीं त्यांची समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु त्याचा मुळींच उपयोग झाला नाहीं. कांहीं केल्या ते आपला हेका सोडिनात. शेवटीं खुद्द शहाजी राजांनीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करून दरबारांत येण्याविषयीं आज्ञा केली. महाराजांच्या मनांतून जरी दरबारांत मुळींच जावयाचें नव्हतें, तरी वडिलांच्या आज्ञेपुढें त्यांचें कांहीं एक चाललें नाहीं. वडिलांची आज्ञा शिरसामान्य करावयाची, म्हणून ते शेवटीं दरबारांत जाण्यास कबूल झाले.

शिवाजी महाराज अल्पवयी होते आणि दरबार कसा तो अद्याप त्यांनीं पाहिलेला नव्हता. तेव्हां तेथें कसें वागावें, हें त्यांना कोठून माहित असणार? म्हणून बादशाहाच्या दरबारीं जाऊन कसें वागावें याची समजूत त्यांस देण्यांत आली व बादशाहास कुर्निसात म्हणजे लवून मुजरा केला पाहिजे नाहींतर त्याचा अपमान होईल, असेंही त्यांस पुनः पुन्हां बजावून सांगण्यांत आलें.

शिवाजी महाराज दरबारास गेले आणि पुनः पुन्हां बजावून सांगितलेलें असूनही बादशाहास कुर्निसात न करितां नुसता सलाम करूनच बसले! "शहाजी राजांचे पुत्र ते हेच काय?" असें बादशाहानें मुरारपंतास विचारिलें. तेव्हां त्यांनीं "होय" असें म्हटलें

आणि बादशाहास रीतीप्रमाणें कुर्निसात न केल्यामुळें त्यास राग येऊं नये म्हणून सांगितलें कीं, "ह्या मुलानें दरबार कधींच पाहिलेला नाहीं, दरबारांत येण्याची आजची ही पहिलीच खेप आहे. घरीं सर्वांस सलाम करण्याची संवय असल्यामुळें हजरतीस त्यानें चुकून सलामच केला. मूल अज्ञान आहे, त्याचा गुन्हा माफ असावा." ह्या बोलण्यानें बादशाहाची समजूत झाली. कांहीं वेळानें बादशाहानें महाराजांस वस्त्रें, जवाहीर वगैरे देऊन निरोप दिला. महाराजांस त्या वस्त्रभूषणाबद्दल आनंद न होतां उलट अधिक तिटकारा आला! ते घरीं येतांच त्यांनीं सर्व वस्त्रें वगैरे टाकून देऊन सचैल स्नान केलें!

ह्यानंतर शिवाजी महाराज केव्हां केव्हां वडिलांबरोबर दरबारास जात असत. परंतु बादशाहास कुर्निसात न करितां प्रत्येक वेळीं ते सलामच करीत असत. प्रत्येक वेळेस ते सलामच करीत असलेले पाहून "हा पोरगा मुद्दामच असा उद्दामपणा करीत असावा" असा बादशाहाच्या मनांत संशय येऊन त्यानें शिवाजी महाराजांस सलाम कां करितोस, असें विचारलें सुद्धां; परंतु महाराज कसले वस्ताद, त्यांनीं चटकन् उत्तर दिलें कीं, "मला प्रत्येक वेळीं कुर्निसात करावयास सांगतात, परंतु ऐन वेळीं चुकून चटकन् मी जोहारच करितों. लेंकराच्या जोहारांतच कुर्निसात आहे. असें हजरतींनीं मानून घ्यावें. शिवाय हजरत आणि माझे वडील हे मला सारखेच वाटतात. हजरत कोणी निराळे आहेत, असें मला वाटल्यास मी कुर्निसात करण्यास शिकेन." महाराजांचें हें चतुरपणाचें उत्तर ऐकून बादशाहास हसूं आलें. त्याचा संशय नाहींसा होऊन उलट महाराजांवर त्याची मर्जी अधिकच सुप्रसन्न झाली!

विजापूर शहर म्हणजे बादशाहाची राजधानी. त्या ठिकाणीं मुसलमानांची वस्ती पुष्कळ होती. त्यांना मांस पाहिजे असल्यामुळें अर्थात्च कसायांचीं बरींच दुकानें तेथें होतीं. दरबारांत जातांना वाटेवरच हीं कसायांचीं दुकानें लागत. त्या ठिकाणीं गोमांस विकावयास ठेविलेलें पाहून महाराजांस अतिशय वाईट वाटे. एके दिवशीं ते त्या रस्त्यानें चालले असतां एक कसाई गाईचा वध करीत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. गाईची अत्यंत दीनवाणी स्थिति आणि कसायाचा निर्दयपणा पाहून त्यांना इतका संताप आला कीं, त्या भरांत त्वेषानें ते ताबडतोब त्या कसायाच्या आंगावर धावून गेले आणि त्यांनीं त्यास यथेच्छ चोप देऊन त्या गरीब गाईची सुटका केली. हा गोवधाचा प्रकार पाहून त्यांस अगदीं वीट आला आणि पुन्हां म्हणून दरबारीं जावयाचें नाहीं, असें त्यांनीं ठरविलें.

वरील प्रकार घडल्यावर महाराजांनीं दरबारांत जावयाचें नाहीं असा निश्चय करून शहाजी राजांस सांगितलें कीं, "रस्तोरस्तीं होणारा गोवध आणि गोमांसाचीं दुकानें हीं पाहून माझें मन फारच कंटाळलें आहे. हा प्रकार बंद होईपर्यंत मी कांहीं दरबारास येणार नाहीं." हें उत्तर ऐकून शहाजी राजांस इकडे आड तिकडे विहीर असें होऊन गेलें. कारण महाराजांवर बादशाहाचा लोभ जडला होता आणि ते दृष्टीस पडले नाहींत म्हणजे तो विचारीत असे. तेव्हां महाराजांस न नेल्यास बादशाहा विचारणार आणि त्यांस चल म्हटल्यास ते कांहीं केल्या येणार नाहींत. अशा दुहेरी पेचांत ते पडले. पुढें काय करावें, हें त्यांना कांहींच सुचेना. इतक्यांत मीरजुम्ला नांवाचा सरदार कांहीं कामासाठीं तेथें आला. त्यास राजांनीं ही गोष्ट

सांगितली तेव्हां त्यानें म्हटलें, "आज मुलास घरीं राहूं द्या. आपण दरबारांत गेल्यावर बादशाहाची मर्जी पाहून ह्याविषयीं गोष्ट काढूं."

दरबारांत गेल्यावर बादशाहाची खुषमर्जी पाहून मीर जुम्ला यानें गोवधाविषयीं गोष्ट मोठ्या युक्तीनें काढली. तो म्हणाला, "खुदावंत, आपण आपल्या प्रजेचे मायबाप आहां. आपली प्रजा हिंदु व मुसलमान या दोन्ही जातींची आहे आणि सर्वांवर आपलें सारखेंच प्रेम आहे. गोवध करणें आणि गोमांस सेवन करणें ह्या दोन्ही गोष्टी हिंदूंस पातकाच्या वाटतात. आपल्या या राजधानींत भर रस्त्यावर गोवध होतात हें पाहून आपल्या हिंदु प्रजेस अतिशय वाईट वाटतें. आपल्या पदरीं मोठमोठे हिंदु सरदार असून ते इमानें इतबारें आपली चाकरी बजावित आहेत, असें असतां त्यांच्या मनाला वाईट वाटण्यासारखें कृत्य आपण न केल्यास बरें होईल. आज शहाजी राजांचे पुत्र दरबारांत आलेले नाहींत, त्याचें कारण तरी मी आतां सांगितलें तेंच आहेत. याकरितां हजरतींनीं या गोष्टीचा विचार करून सर्व लोकांस संतोष होईल, अशी कांहीं व्यवस्था केली तर फार चांगलें होईल, असें मला वाटतें." मीरजुम्लाच्या ह्या भाषणाचा परिणाम बादशाहाच्या मनावर फार चांगला झाला. त्यानें शहराच्या दक्षिण बाजूस कसाईपुरा वसवून शहरांतल्या सगळ्या कसायांस तेथें जाऊन राहण्याचा हुकूम केला आणि "यापुढें विजापूर शहरांत कोणीही गोहत्या करूं नये किंवा गोमांस विक्रीस मांडूं नये" अशी सर्व शहरांत सक्त ताकीद देवविली. याप्रमाणें व्यवस्था झाली तेव्हां शिवाजी महाराज पुन्हां बादशाहाच्या दरबारास गेले.

एकदां शिवाजी महाराज आपल्या सोबत्यांबरोबर घोड्यावर

बसून फिरावयास जात असतां, शहरच्या दरवाजांतच एक कसाई गोमांस विकित बसलेला त्यांच्या दृष्टीस पडला. त्यास पाहतांच महाराजांस अत्यंत त्वेष येऊन तरवार उपसून ते त्याच्या अंगावर धावून गेले आणि त्यांनीं तेथल्यातेथें तावडतोब त्या कसायाचा शिरच्छेद केला!

ही गोष्ट ऐकून शहरांत फारच गवगवा झाला. "आजच मुसलमानांचें राज्य बुडालें काय? मुसलमानांचा या ठिकाणीं कांहींच बोज राहिला नाहीं. हा शहाजीचा पोरगा तर इतका उद्दाम झाला आहे कीं, बादशाहास तो कुर्निसातही करीत नाहीं आणि आतां तर तो दिवसाढवळ्या भर रस्त्यांत मुसलमानांचे खून करूं लागला." असें जो तो मुसलमान म्हणूं लागला.

नुसता गवगवा होऊनच ही गोष्ट थांबली नाहीं. त्या कसायाच्या बायकोस लोकांनीं भर देऊन बादशाहाकडे ही फिर्याद नेवविली. बादशाहानें सर्व हकिकत नीट ऐकून घेऊन म्हटलें कीं, "शिवाजी राजे यांनीं जें केलें तें योग्यच केलें. कोणीही शहरांत येऊन मांस विकावयास बसूं नये अशी ताकीद दिली असतां कसायानें ती जुमानली नाहीं. त्यामुळें त्याला शिवाजी राजे यांनीं जी शिरच्छेदाची शिक्षा दिली ती अगदीं योग्यच होय." नंतर त्या कसायाच्या बायकोस खर्चासाठीं कांहीं द्रव्य देऊन तिची रवानगी केली.

हा सर्व प्रकार पाहून शिवाजी महाराजांस आतां आपल्याकडे ठेवणें योग्य नाहीं, असें शहाजी राजांस वाटलें आणि त्यांनीं त्यांची पुण्यास रवानगी केली. ही गोष्ट घडली त्यावेळीं महाराजांचें वय चौदा पंधरा वर्षांचें होतें. यावरून 'तेजस्वी ते वृत्ति ऐशी जयांची.

तेथें कांहीं चाड नाहीं वयाची' या वचनाची आठवण होते. गोब्राह्मणप्रतिपालक, हिंदुधर्मसंरक्षक, क्षत्रियकुलावतंस वगैरे विशेषणें महाराजांस लावितात तीं किती यथार्थ आहेत, हें त्यांच्या बालपणांतील वरील एकाच गोष्टीवरून सहज समजेल.

---

# बाप आणि गुरु सारखेच पूज्य.

## शिकंदर बादशाहा.

[ ग्रीस देशाचा जग जिंकणारा प्रसिद्ध बादशाहा. ]

शिकंदर बादशाहाचा बाप फिलिप याला आपल्या मुलाच्या शिक्षणाबद्दल फार कळकळ होती. आपण बादशाहा, आपल्या पुत्रास शिक्षणाची काय जरूर आहे? असें त्याच्या मनांत केव्हांही आलें नाहीं. अरिस्टाटल या नांवाचा एक मोठा विद्वान् गृहस्थ होता. त्याजकडून आपण आपल्या मुलास योग्य शिक्षण द्यावें, असें त्यानें ठरविलें. त्यानें अरिस्टाटलास या बाबतींत पहिलें पत्र पाठविलें, त्यांत लिहिलें होतें कीं, "देवानें मला पुत्र दिला, ही त्याची मजवर कृपा आहेच, परंतु आपण जिवंत असतां त्यानें हा पुत्र मला दिला, हा त्याचा मजवर महाप्रसाद आहे आणि त्याबद्दल ईश्वराचे मी फार फार उपकार मानितों. हा माझा पुत्र आपला शिष्य व्हावा, तो अज्ञान आहे त्याला आपण ज्ञानी करावें, अशी आपणांस विनंति आहे. आपण हें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावाल, यांत मला

तिलप्राय शंका वाटत नाहीं." याप्रमाणें कळवून शिकंदरास त्यानं त्याच्या हाताखालीं विद्याभ्यासाकरितां ठेविलें.

शिकंदरासारखा बुद्धिमान् जिज्ञासु विद्यार्थी आणि अरिस्टाटल सारखा महा विद्वान् व ममताळू शिक्षक, मग काय विचारावयाचें? दुधांत साखर पडल्यासारखेंच झालें. आपल्या गुरुत्वाची कुशलता प्रकट करण्यास शिकंदरासारखा दुसरा शिष्य मिळावयाचा नाहीं, असें समजून अरिस्टाटल त्याच्यावर फार लोभ करी, आणि त्याला जें कांहीं शिकवावयाचें तें तो अगदीं मन लावून शिकवी. त्यामुळें थोड्याच दिवसांत शिकंदर फार हुशार व मार्मिक विद्यार्थी तयार झाला. गणित, न्यायशास्त्र, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, चित्रकला वगैरे अनेक गहन गहन विषय त्यानें त्यास शिकविले. नीतिशास्त्र हें राजेलोकांच्या विशेष उपयोगाचें असल्यामुळें अरिस्टाटलनें त्या विषयाकडे फार लक्ष दिलें होतें. आपला पुत्र याप्रमाणें हुशार झाल्यामुळें फिलिप बादशाहास मोठी धन्यता वाटली. परंतु यांत मुलाच्या आंगची हुशारी असली तरी त्याच्या गुरूच्या कर्तबगारीचीच किंमत जास्त आहे, हें त्याला समजल्यावांचून राहिलें नाहीं. त्यानें या कामगिरीबद्दल आरिस्टाटलास चांगली नेमणूक करून दिली.

बापाचें कर्तव्य बापानें केलें, पण शिकंदरही आपल्या गुरूचे उपकार पूर्णपणें जाणून होता. तो ते उपकार कधींही विसरला नाहीं. आपले गुरु महाविद्वान् असून ते आपणास अत्यंत पूज्य आहेत, अशा भावनेनें तो नेहमीं त्याच्याशीं वागे. आपण राजपुत्र आहों तेव्हां गुरूचा मान ठेवण्याचें किंवा त्याच्याबद्दल पूज्यबुद्धि बाळगिण्याचें काय कारण आहे, असा मूर्खपणाचा विचार त्याच्या कधीं

स्वप्नांतही आला नाहीं. तो आपल्या गुरूस आपल्या बापाप्रमाणें पूज्य मानी. तो शिकवील तें शिकावें आणि तो सांगेल तसें वागावें, असा त्याचा वर्तनक्रम असे. तो उघडपणें म्हणे कीं, " बापानें जन्म देऊन पालन पोषण केलें आणि गुरूनें विद्या देऊन माझ्या जन्माचें सार्थक केलें, तेव्हां ते दोघेही मला सारखेच पूज्य आहेत. "

---

# सरळ स्वभाव.

## महादेव गोविंद रानडे.

[ सुप्रसिद्ध विद्वान्. मुंबई हायकोर्टाचे जज्ज. ]

एकदां माधवरावांच्या आईनें याला बर्फीचा एक तुकडा दिला आणि दुसऱ्या हातांत दुसरा एक लहानसा तुकडा दिला आणि त्यांना सांगितलें कीं, " हा तूं खा आणि तो मोलकरणीच्या मुलाला नेऊन दे. " त्यांनीं लहान तुकडा आपल्या तोंडांत घालून मोठा तुकडा मोलकरणीच्या मुलाला नेऊन दिला. त्या मोलकरणीच्या मुलाच्या हातांत मोठी वडी पाहून ती माधवरावांस म्हणाली, " मी तुला दिलेली मोठी वडी न खातां त्या मुलाला देऊन तूं धाकटा तुकडा कां खाल्लास? " यावर ते म्हणाले, " तूं या हातांतला तुकडा त्या मुलाला नेऊन दे असें सांगितलेंस म्हणून मीं तो त्याला नेऊन दिला. " तेव्हां बोलण्यांत आपल्याकडूनच चूक झाली, असें तिला समजून आलें.

खाऊ म्हटला कीं, ' मला अधिक पाहिजे ' ' मला आणखी दे ' ' मी जास्त घेणार ' असें पुष्कळ मुलें म्हणतात. त्यांना खाऊची फार हांव असते, पण छोटा माधव आपला सालस मुलगा! त्याला आईच्या आज्ञेंत वागावयाचें तेवढें ठाऊक. नाहींतर आई जीव तोडून सांगत आहे पण तिकडे लक्ष न देतां तिचा आज्ञाभंग करणारीं थोडीं का मुलें असतात?

---

# उधार वस्तु घ्यायची नाहीं.

## महाराणी व्हिक्टोरिआ.

[ बादशहा पंचमजॉर्ज यांच्या आजीबाई. ]

महाराणी व्हिक्टोरीआ लहान असतां, एकदां एका जत्रेस गेल्या होत्या. तेथें त्यांनीं आपल्या सर्व खेळगड्यांस व नातलगांस देण्याकरितां बऱ्याच जिनसा खरेदी केल्या. या कामीं त्यांच्या जवळ असलेले सर्व पैसे संपून गेले. इतक्यांत आपल्या एका नातेवाइकाची त्यांस आठवण झाली आणि त्यास देण्याकरितां एक वाजवावयाची पेटी घेण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली. तेव्हां दुकानदारानें इतर सामानाबरोबर ती पेटीही बांधली. परंतु त्यांची शिक्षकीण बरोबर होती, ती दुकानदारास म्हणाली, " ती पेटी सामानांत घालूं नको, कारण पेटीची किंमत देण्यापुरते पैसे आतां राजकन्येजवळ नाहींत आणि किंमतीचे पैसे न देतां, उधार वस्तु नेण्याचें वेडेपण राजकन्या

मुळींच करणार नाहीं. " हें भाषण ऐकून महाराणी साहेब मनांत उमजल्या आणि त्यांनीं ती पेटी घेण्याचा नाद सोडून दिला. त्यांचें मन त्या पेटीवर बसलेलें आहे, असें पाहून दुकानदार म्हणाला, " आपण पेटीचे पैसे पाठवीपर्यंत मी ती पेटी तशीच ठेवितों, दुसऱ्या कोणास विकित नाहीं. " नंतर दुसऱ्या दिवशीं रोख पैसे पाठवून ती पेटी आणली.

आपल्याजवळ पैसा नसला तरी उधार वस्तु घेणाऱ्या व आपल्या आवडत्या वस्तूंसाठीं आईबापास त्रास देणाऱ्या मुलांनीं महाराणी-साहेबांच्या बालपणांतील ही गोष्ट लक्षांत ठेवावी.

---

# संगतीचा परिणाम.

## मोहनदास करमचंद गांधी.

[ महात्मा गांधी. आपल्या देशांतील सुप्रसिद्ध स्वदेशभक्त. ]

मोहनदासांची आई जुन्या धार्मिक मताची असून आपल्या मुलांस शिक्षण देण्याच्या कामीं फार दक्ष असे. आपलीं मुलें प्रामाणिक व सद्वर्तनी निघावीं म्हणून तिची मोठी इच्छा होती. यामुळें ती आपल्या मुलावर कडक नजर ठेवीत असे आणि तेही तिच्या इच्छे-प्रमाणें वागत असत.

संगतीचा परिणाम मनुष्याच्या मनावर झाल्याशिवाय राहत नाहीं. चांगल्या संगतीचा चांगला परिणाम आणि वाईट संग-

तीचा वाईट परिणाम होतो; असें म्हणतात, तें अगदीं खरें आहे. इंग्रजी शाळेंत अभ्यास करीत असतां, मोहनदासासारख्या धार्मिक आईबापांच्या उपदेशाप्रमाणें चालणाऱ्या मुलांच्या धार्मिक वृत्तींत कुसंगतीपासून एकाएकीं मोठा फरक घडून आला! जे मोहनदास मोठ्या भक्तिभावानें देवाची पूजा करून पोथीचा पाठ करीत असत, त्यांनाच तीं कृत्यें करण्यांत कांहींच अर्थ नाहीं, असें वाटूं लागून ते त्याबद्दल आपल्या आईला उलट भलभलते प्रश्न विचारूं लागले. धार्मिक बाबतींत त्यांचीं मतें अगदीं पाखंडी बनलीं आणि मांस खाल्ल्यावांचून आपल्या आंगीं जोम येणार नाहीं, असें त्यांचें ठाम मत झालें! अशा तऱ्हेचीं त्यांचीं मतें बदलण्यास कारण संगति! त्यांना अशा प्रकारच्या मताच्या कांहीं मंडळीची संगति लागली आणि त्यांच्या विचारांची छाप त्यांच्यावर पडून असा फरक पडला.

मांस खाणें मोहनदासांच्या जातींत वर्ज्य होतें. परंतु वर सांगितलेल्या विचित्र मंडळींच्या संगतीपासून त्यांच्या मनावर उलट परिणाम झाला होता! इंग्रजी शाळेंतलीं अर्ध्या कच्च्या विचाराचीं कितीतरी उल्लू मुलें भलभलत्या मार्गास लागत असतात. त्यांना वाटत असतें कीं, "आम्ही शहाणे, आम्हांला कळतें तसें जगांत दुसऱ्या कोणाला कळत नाहीं." अशाच विचाराचीं कित्येक मुलें मोहनदासांभोंवतीं गोळा झालीं आणि सात्विक खाण्यानें आपल्या आंगांत मुळींच जोम राहात नाहीं यासाठीं मांसाहार करणें हेंच योग्य आहे, असें त्यांनीं ठरविलें. त्या मंडळींत कित्येक मुलें मूळचीं मांसाहारी होतीं; परंतु जीं मोहनदासांसारखीं दुसरीं कांहीं मुलें मुळींच

मांसाहार करीत नव्हतीं, त्यांच्या मनावर युक्तिवादानें परिणाम करून त्यांनाही मांसाहाराची दीक्षा देण्याचें त्यांनीं ठरविलें.

या शाळेंतल्या विद्यार्थ्यांनीं नदीच्या कांठीं जाऊन खाना बनविण्याचा ठराव केला. बोलून चालून चोरीच ती! तेव्हां ती लपून छपूनच केली पाहिजे. घरच्या मंडळींना ही गोष्ट कळतां कामा नये, अशी त्यांची इच्छा होती. खाण्याकरितां मांस तयार करण्याचें काम त्यांच्या एका मुसलमान मित्रानें पतकरिलें, आणि विद्यार्थ्यांचा हा क्रम कित्येक दिवस पर्यंत चालू होता.

मोहनदासांना त्या मंडळीनें मांसाहाराची दीक्षा दिली. एके दिवशीं संध्याकाळीं मांसाहारी मंडळीचा हा अड्डा नदी किनाऱ्यावर गेला व तेथें त्यांनीं ते मांसाचे पदार्थ खाल्ले. पहिल्या वेळीं हे पदार्थ त्यांस चांगलें लागले नाहींत, परंतु कांहीं दिवसांनंतर त्यांचीच चटक लागून ते खाण्यांतच त्यांस आनंद वाटूं लागला! घरच्या मंडळीस ही गोष्ट कळूं नये, म्हणून मोहनदासांस फार जपावें लागे. मांसाचे पदार्थ खाऊन आल्यावर त्या दिवशीं त्यांना जेवण कमीच जात असे. " कमी कां जेवलास? " असें आईनें विचारलें म्हणजे ' मला भूक नाहीं ' असें त्यांस खोटें बोलावें लागत असे! परंतु अशा रीतीनें खोटें बोलण्यापासून त्यांना जें कांहीं दुःख होत असे तें वर्णन करितां येत नाहीं! एके दिवशीं त्यांनीं आईशीं अशी लबाडी केली, परंतु त्या दिवशीं त्यांच्या मनाला त्या गोष्टीचें अतिशय दुःख झालें, आणि त्यांनीं आपल्या त्या मित्रांची संगति सोडून दिली व मांसाहारही सोडून दिला.

मोहनदासांची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा उतरल्यावर बॅरिस्टरीचा

अभ्यास करण्याकरितां विलायतेस जाण्याची पुष्कळ लोकांनीं त्यांना सल्ला दिला आणि त्यांच्याही मनानें तेंच घेतलें होतें. परंतु या गोष्टीस कांहीं केल्या त्यांच्या आईची संमति मिळेना. विलायतेस जाऊन कित्येक विद्यार्थी बिघडल्याचें तिच्या कानीं आलें होतें. त्यामुळें आपल्या मुलास तिकडे पाठवावें, असें तिला वाटेना. शेवटीं, मद्य पिणार नाहीं, मांस खाणार नाहीं, आणि सद्वर्तनानें चालेन अशी शपथ मोहनदासांकडून एका जैन साधू समक्ष तिनें घेवविली. तेव्हां त्यांस विलायतेस जाण्यास तिनें परवानगी दिली! मोहनदासांनीं ही शपथ पूर्णपणें पाळिली. विलायत म्हणजे मांसाहारी देश आणि मद्यप्राशनही त्या ठिकाणीं सर्व साधारण, असें असतां त्या ठिकाणीं ही शपथ पाळणें किती कठीण असेल बरें! त्यांनीं मद्यपि व मांसाहारी लोकांची संगति अजिबात सोडून दिली आणि एक लहानशी खोली भाड्यानें घेऊन स्वतः हातानें स्वयंपाक करून ते राहूं लागले.

बालपणाचा उल्लूपणा नाहींसा झाला, मांसाहाराची संवय सुटली आणि धार्मिक ग्रंथांच्या वाचनानें त्यांचीं पाखंडी मतेंही नाहींशीं होऊन ते सात्विक वृत्तीचे बनले. आज याच पुरुषाला सर्व लोक महात्मा गांधी या श्रेष्ठ नांवानें ओळखतात.

# भय म्हणजे काय?

## नेल्सन.

[ ब्रिटिश आरमारावरील एक विख्यात सेनापति. ]

नेल्सन हा लहान असतां आपल्या आजीस भेटण्यासाठीं आजोळीं कांहीं दिवस जाऊन राहिला होता. एके दिवशीं संध्याकाळीं तो एकाटाच कोठें बाहेर फिरावयास गेला होता. हें घरच्या मंडळीस माहित नसल्यामुळें मुलगा कोठें गेला म्हणून आजीनें व तिच्या घरच्या सर्व मनुष्यांनीं त्याचा जिकडे तिकडे तपास सुरू केला. त्यांपैकीं एका मनुष्याला तो एका मोठ्या ओढ्याच्या कांठीं उभा असलेला आढळला. तेव्हां त्यानें त्याला तेथून घरीं आणलें.

मुलगा कोठें गेला असेल म्हणून आजी काळजी करीत होती. तिला तो येतांच समाधान वाटलें. कोठें सांपडला वगैरे चौकशी करितांना त्या मनुष्यानें ओढ्याच्या कांठीं सांपडल्याचें तिला सांगितलें. तेव्हां आजीनें त्याला विचारिलें, "नेल्सन, तूं त्या ओढ्यावर काय रे करीत होतास?" नेल्सन म्हणाला, "आजी, तो ओढा मोठ्या वेगानें वाहात होता आणि त्यांतून उतरून अलीकडे येणें कठीण होतें. तो सगळा वाहून जाईपर्यंत मी तेथें उभा राहणार होतों." मुलाचें हें अज्ञानपणाचें उत्तर ऐकून आजीला फारच हसूं आलें. ती म्हणाली, "बाळ नेल्सन, रात्र झाली म्हणजे श्वापदें येऊन आपणांस खाऊन टाकतील असें भयसुद्धां तुला कसें वाटलें नाहीं?" यावर तो म्हणाला, "आजी, भय म्हणजे कसलें ग

असतें? मला तर अझूनपर्यंत तें कोठें पहावयास मिळालें नाहीं." लढवय्या माणसाच्या आंगीं असलेलें धैर्य व निर्भयता हे गुण नेलसनच्या आंगीं बालपणींच होते असें या गोष्टीवरून स्पष्ट दिसतें.

---

## परीक्षेचा दिवस.
### स्वामी विवेकानंद.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ३०५३

[ स्वामी रामकृष्ण परमहंसांचे शिष्य. हिंदु धर्माची थोरवी सर्व जगास पटवून देणारे सुप्रसिद्ध साधु. ]

स्वामी विवेकानंद हे विद्याभ्यास करीत असतां एकदां एका वार्षिक परीक्षेच्या दिवशीं सकाळच्या वेळीं मौजेनें गाणीं गात स्वस्थ बसले होते. हें पाहून त्यांच्या सोबत्यांपैकीं एकजण त्यांना म्हणाला, "काय रे नरेंद्र, (विवेकानंदांचें मूळचें नांव नरेंद्र असें होतें.) तुझें आपलें सारेंच विचित्र! आतां दुपारीं आपली परीक्षा सुरू व्हावयाची आहे. तेव्हां जो थोडासा वेळ शिल्लक आहे तेवढ्या वेळांत आपल्या अभ्यासाची उजळणी केल्यास चांगलें नाहीं कां? अभ्यासाची उजळणी करावयाची सोडून तूं आपला मजेंत गात बसला आहेस, याचा अर्थ काय?" विवेकानंदांनीं उत्तर केलें, "गड्या, आपली आज जी परीक्षा व्हावयाची आहे ती आपण वर्षांत जें काय शिकलों, सबंध वर्षांत जो कांहीं अभ्यास केला,

त्याची होणार आहे. आतां अभ्यास करून दुपारीं आपण पास होऊं असें नाहीं ना? तूं म्हणशील, थोडीशी उजळणी केली तर ती उपयोगी पडेल. तुझें म्हणणें कांहीं अंशीं बरोबर असलें तरी एकंदरींत तें फायदेशीर नाहीं. परीक्षेच्या दिवशीं आपलें चित्त प्रफुल्लित असलें म्हणजे बुद्धीला तरतरी असते. आणि अशा स्थितींतच परीक्षेच्या प्रश्नांचीं उत्तरें चांगलीं सुचतात. परीक्षेच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें काम करण्यापूर्वीं मेंदूला विश्रांति व उत्साह पाहिजे म्हणून मी मुद्दाम विसांवा घेत आहें. आतां मेंदूला त्रास देऊन पुन्हां दुपारीं काम करण्यास उत्साह राहणार नाहीं." विवेकानंदांचें म्हणणें अगदीं योग्य आहे.

---

# मी काय म्हणून शाळा सोडावी?

## जेम्स गार्फील्ड.

[ अमेरिकेचे एक प्रेसिडेंट. ]

जेम्स गार्फील्ड हायस्कुलांत शिकत असतां त्याच्या शाळेंतील एका खोडकर मुलानें एका सभ्य गृहस्थाची कुचेष्टा केली. तेव्हां त्या गृहस्थानें ती गोष्ट शाळेच्या प्रिन्सिपालाच्या कानावर घातली. आतां प्रिन्सिपाल या मुलाला शिक्षा केल्यावांचून सोडणार नाहींत, अशी सर्व मुलांची खात्री होऊन चुकली. पुष्कळ वेळां अशा तऱ्हेच्या

अपराधी मुलाबद्दल शाळेंतील बरींच मुलें सहानुभूति दाखवितात. त्याप्रमाणें या ठिकाणींही झालें. त्या मुलाला प्रिन्सिपालांनीं शाळें- तून घालवून दिलें, तर आम्हीसुद्धां शाळा सोडून जाणार, असा शाळेंतल्या सुमारें वीस मुलांनीं कट केला आणि तीं सारीं मुलें शा- ळेंतल्या बाकीच्या मुलांचीं मनें वळवूं लागलीं. जेम्सला आपल्या बाजूस वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. परंतु अपराधी मुलाबद्दल अशा भलत्याच रीतीनें सहानुभूति दाखविण्याचें जेम्सनें नाकबूल केलें. "त्याच्या अपराधावरून प्रिन्सिपालांनीं त्याला शाळेंतून घाल- वून दिलें, तर मी काय म्हणून शाळा सोडावी? अझून त्याला कांहीं शाळेंतून घालवून दिलेलें नाहीं आणि घालवून दिलें म्हणून खरें खोटें कांहीं एक न पाहतां, आपण त्याचा पक्ष घेऊन उठाव- याचें ही कोठली रीत?" असें त्यानें त्या मुलांस उत्तर दिलें. मुलगे म्हणाले, "वेळ आली म्हणजे तसें सुद्धां वागलें पाहिजे. आपला शाळासोबती अविचारानें वागला असला तरी त्याला मदत करणें हें आपलें कर्तव्यच आहे." यावर जेम्सनें म्हटलें, "ही कांहीं त्याला योग्य रीतीनें मदत करण्याची रीत झाली नाहीं. त्याला आ- पल्या गैर वर्तनाचा पश्चात्ताप झाला पाहिजे. त्यानें त्या गृहस्थाची माफी मागावी आणि पुन्हां असें करणार नाहीं, म्हणून प्रिन्सिपाल साहे- बांस सांगावें. अशा तऱ्हेनें त्या मुलानें आपल्या बचावाचा पहि- ल्यानें प्रयत्न करावा, म्हणजे मग मी त्याला मदत करीन." जेम्सचें हें म्हणणें बहुतेक मुलांना पटलें. त्याच्या म्हणण्याप्रमाणें त्या मुलानें माफी मागितली आणि कोणत्याही प्रकारें विकोपास न जातां त्या गोष्टीचा गोडीनें शेवट झाला. आपला शाळासोबती

असला म्हणून अन्यायाच्या कामीं भलत्याच रीतीनें आपण त्याला साह्य करून प्रोत्साहन देणें हें अगदीं गैर आहे. असें त्यानें आपल्या करारी वर्तनानें सर्व मुलांस दाखवून दिलें.

---

# रडूं कां आलें ?

## गोपाळ कृष्ण गोखले.

[ आपल्या देशांतील प्रसिद्ध देशभक्त. ]

गोपाळ मराठी तिसऱ्या चौथ्या इयत्तेंत असतां एके दिवशीं त्याच्या मास्तरांनीं अंकगणितांतलें एक उदाहरण घरून करून आणण्यासाठीं नेमून दिलें होतें. उदाहरण कठीण असल्यामुळें गोपाळाखेरीज वर्गांतल्या दुसऱ्या कोणत्याही मुलानें तें करून नेलें नव्हतें. उदाहरण कठीण असून तें फक्त एकाच मुलानें चांगल्या रीतीनें सोडविलें आहे, असें पाहून मास्तर अर्थांतच गोपाळावर फार खूष झाले. या कामगिरीबद्दल त्यांनीं त्याला फार शाबासकी देऊन वर्गांत पहिला नंबर दिला.

इतकी शाबासकी मिळून पहिला नंबरही मिळाला. परंतु त्यामुळें गोपाळास आनंद न वाटतां, उलट फार दुःख झालें. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. एकाएकींच या मुलाला रडावयास काय झालें, हें मास्तरांच्या ध्यानांत मुळींच येईना. त्यांनीं त्याला

जवळ ओढून घेऊन कुरवाळून मोठ्या प्रेमानें विचारलें, " का बाळ, काय झालें? तूं उगाच कां रडतोस? तुझी कोणी खोडी काढली कीं काय?" मास्तरांचें हें प्रेमाचें भाषण ऐकून तो अधिकच स्फुंद-स्फुंदून रडूं लागला. शेवटीं आपल्या रडण्याचें खरें कारण त्यानें आपल्या गुरुजींना सांगितलें.

गोपाळ म्हणाला, " गुरुजी, मी आपणापाशीं लबाडी केली आहे. इतर मुलांप्रमाणें मलाही हें उदाहरण येत नव्हतें. परंतु वरच्या वर्गांतल्या दुसऱ्या एका मुलाला विचारून मी तें उदाहरण करून आणिलें आहे. दुसऱ्याला विचारून केलेलें उदाहरण मीच आपल्या अकलेनें सोडवून आणलें असें आपणांस भासवून मी आपणाशीं लबाडी केली आहे. तरी माझ्या या लबाडीबद्दलच आपण मला क्षमा करावी." गोपाळाच्या या भाषणानें मास्तरांना अधिकच आनंद झाला.

---

# सत्याची आवड.

## प्रिन्स बिस्मार्क.

( जर्मनीचे प्रधान. ]

प्रिन्स बिस्मार्क हे जर्मनीचे प्रधान होते, राजकारणी होते. राजकारण म्हटलें म्हणजे त्यांत असत्याचा अवलंब केला पाहिजे, आंत एक आणि बाहेर एक असें केल्यावांचून राजकारणांत चालतच नाहीं,

असें पुष्कळ लोक म्हणतात. परंतु बिस्मार्क यांनीं हें म्हणणें अजिबात खोटें करून दाखविलें. " राजकारणांत गेलेल्या माझ्या सर्व आयुष्यांत मी एकही असत्य शब्द उच्चारला नाहीं " असें वृद्धपणीं बिस्मार्क मोठ्या अभिमानानें म्हणत असत. आणि हे त्यांचे अभिमानोद्गार अगदीं यथार्थ होते. असें त्यांचे सर्व चरित्रलेखक म्हणतात.

प्रिन्स बिस्मार्क यांना सत्यव्रतांत जें एवढें यश आलें होतें, त्याचें बाळकडू त्यांच्या आईनें त्यांना पाजिलें होतें. सत्य भाषण करण्याबद्दल तिनें त्यांना अगदीं लहानपणींच वळण लाविलें होतें. बालपणीं अगदीं क्षुल्लक बाबतींतही ते कधीं खोटें बोलत नसत. एके दिवशीं रात्रीच्या वेळीं ते निजावयास जाऊं लागले असतां, " बाळ, तुझें जेवण झालें काय? " असा आईनें त्यांना प्रश्न केला. ते कसल्याशा विचारांत गुंग असल्यामुळें आपण जेवलों कीं नाहीं, हें त्यांना बरोबर आठवेना. तेव्हां ते धांवत धांवत स्वयंपाकीणबाईकडे गेले आणि " मी जेवलों कीं नाहीं? " असें तिला विचारूं लागले. तिनें ' तूं जेवलास ' असें उत्तर देतांच त्यांच्या मनाची खात्री होऊन परत येऊन त्यांनीं आपल्या आईला ' होय ' म्हणून उत्तर दिलें. आईनें विचारतांच होय म्हणून त्यांनीं म्हटलें असतें तर चाललें असतें. परंतु आपल्या समजुतीविरुद्ध किंवा खात्री नसलेली गोष्ट सांगणें म्हणजे खोटें बोलणेंच होय असें त्यांस वाटलें.

# बक्षीस पटकाविलें.

## आल्फ्रेड दि ग्रेट.

[ इंग्लंड देशांतील एक प्रसिद्ध राजा. ]

आल्फ्रेड दि ग्रेट हा लहान पांच वर्षांचा असतां, त्याच्या आईनें एक सुंदर पुस्तक आणून तें आपल्या सर्व मुलांस दाखविलें. तें फार छानदार अक्षरांनीं लिहिलेलें असून त्यांत उत्तमोत्तम चित्रें व वेलबुट्या काढलेल्या होत्या. तें पुस्तक पाहातांच सर्व मुलांस मोठा आनंद होऊन जो तो तें पुस्तक ' मला दे, मला दे ' म्हणून तिजकडे मागूं लागला. तेव्हां त्यांची आई त्यांस म्हणाली, " तुमच्यांपैकीं जो कोणी या पुस्तकांतील कविता पाठ करून मला बिनचूक म्हणून दाखवील, त्यालाच हें पुस्तक मी बक्षीस देईन." हे शब्द ऐकून आल्फ्रेडनें ताबडतोब तें पुस्तक तिच्या हातून काढून घेतलें आणि त्याला वाचतां येत नव्हतें तरी तें पुस्तक घेऊन तो आपल्या धर्मगुरूकडे गेला, आणि त्याच्याकडून पुनः पुन्हां तें पुस्तक वाचून घेऊन त्यानें सर्व कविता तोंडपाठ करून टाकल्या, आणि आईच्या अटीप्रमाणें तें बक्षीस पटकावलें. यशप्राप्तीसाठीं चिकाटीनें प्रयत्न करावयाचा हा गुण लहानपणींच त्याच्या आंगीं बाणला होता. पुढील आयुष्यांत या गुणांचा त्याला अतिशय उपयोग झाला.

# तुम्ही कोण होणार?

## हरि नारायण आपटे.

[ मराठींतील उत्कृष्ट कादंबरीकार. ]

हरिभाऊंची आई अगदीं लहानपणीं निवर्तली. आजीचा विशेष लळा असल्यामुळें ते नेहमीं आपल्या आजीजवळ असत. त्यांचे चुलते महादेव चिमणाजी आपटे हे या वेळीं मुंबईस असत. त्यांच्याच घरीं हरिभाऊंचें बालपण गेलें. हरिभाऊ हे घरांत एकुलते एक असल्यामुळें व आईवेगळें मूल म्हणून घरांतील सर्व माणसें त्यांचे फार लाड करीत असत.

हरिभाऊ हे लहानपणीं फार हुशार पण खोडकर होते. दुसऱ्यांच्या नकला करण्यांत त्यांना फार गंमत वाटे. डोकीवर भाजीची टोपली घेऊन भाजीवाली ओरडत जाते त्याप्रमाणें नक्कल करण्याकरितां छोट्या हरीनें डोकीवर कांहीं तरी घेऊन सगळ्या चाळभर ओरडत फिरावें. एखाद्या वेळीं जादूगाराचा खेळ पाहिला म्हणजे त्याच्या सारखा पसारा मांडून व तोंडानें पुंगी वाजवून हुबेहुब जादुगाराची नक्कल करावी. या त्याच्या नकला पाहून सर्व मंडळींचें हसतां हसतां पोट दुखे.

बायकामंडळी डाळ निवडित बसली म्हणजे हरिभाऊंनीं चटकन् येऊन ती उडवून पळावें. आतां तुझी मुंज झाली आहे, तूं लंगोटी सोडूं नये असें घरांत कोणी म्हटलें असतां, मुद्दाम लंगोटी

सोडून रस्त्यापर्यंत त्यांनीं जाऊन यावें. अशा खोड्या करण्याची जरी त्यांची प्रवृत्ति होती, तरी चुलत्याच्या ते धाकांत असत. बाल-स्वभावानुसार खोड्या करण्याची जरी त्यांची प्रवृत्ति होती, तरी खेळण्यापेक्षां वाचनाकडे त्यांचें विशेष लक्ष असे. हरिभाऊ हे सर्वांचेच लाडके असल्यामुळें त्यांचे लाड पुरविले जात. त्यांनीं मागितलेली वस्तु त्यांना चटकन् मिळे. इतर वस्तूंपेक्षां गोष्टींचीं पुस्तकें त्यांना अतिशय आवडत असत. लहानपणापासूनच गोष्टींचीं पुस्तकें वाचण्याचा त्यांना अतिशय नाद लागला होता. त्यामुळें अशीं पुस्तकें आणून देण्याविषयीं ते आपल्या काकांकडे हट्ट घेत आणि त्यांचे काकाही त्यांचा तो हट्ट मोठ्या आवडीनें पुरवीत असत.

हरिभाऊंचे चुलते हायकोर्ट वकील होते. त्यांच्या घरीं पुष्कळ विद्वान् माणसें येत. त्यांत नोकरी म्हणजे गुलामगिरी, ती करूं नये, अशा प्रकारची चाललेली चर्चा हरिभाऊंच्या मनावर ठसून आपण कोणाचीही नोकरी पतकरणार नाहीं, असें त्यांनीं सहा सात वर्षांच्या वयांतच आपल्या मनाशीं ठरवून टाकलें. ते म्हणत, "आपण नाहीं बुवा कोणाची चाकरी करणार?" हेच त्यांचे उद्गार खरे झाले. कारण आमरण त्यांनीं कोणाची चाकरी केली नाहीं.

चार मित्रमंडळी एकत्र जमली असतां, निरनिराळ्या प्रकारच्या पुष्कळ गप्पागोष्टी व प्रश्नोत्तरें होतात. त्यांत "तूं पुढें काय करणार?" असा प्रश्नही कांहीं विद्यार्थी आपल्या सोबत्यांस करीत असतात. एकदां हरिभाऊ व त्यांचे मित्र गोपाळराव गोखले हे अशाच गोष्टी बोलत बसले असतां "तूं कोण होणार? तुझी कोण होण्याची इच्छा आहे" असे प्रश्न ते एकमेकांना करूं लागले. गोख-

त्यांनीं हरिभाऊंना प्रश्न केल्यावर उलट हरिभाऊंनीं तोच प्रश्न त्यांना करून तुम्हीच आधीं सांगा, असें म्हटलें. तेव्हां गोखले म्हणाले, " आमरण देशसेवा करावी अशी माझी इच्छा आहे." त्यानंतर हरिभाऊंनीं " आपल्या समाजास सन्मार्ग दाखविणाऱ्या कादंबऱ्या लिहून नामांकित कादंबरीकार व्हावें, अशी माझी इच्छा आहे." असें सांगितलें. आपल्या इच्छेप्रमाणें गोखले व हरिभाऊ यांनीं लहानपणीं केलेले बेत उत्तम रीतीनें सिद्धीस नेले. असें त्या उभयतांच्या चरित्रांवरून स्पष्ट दिसून येतें. लहानपणींच आपलें आवडतें ध्येय ठरवावें आणि तें गांठण्याचा दृढनिश्चयपूर्वक प्रयत्न करावा. ' मी कोण होणार? ' हा प्रश्न आपला आपल्याशीं तरी सोडविलाच पाहिजे.

---

# दीनांची करुणा.

## जोसेफ माझिनी.

[ इटाली देशास स्वतंत्रता मिळवून देणारा, त्या देशांतील एक विख्यात देशभक्त. ]

एके दिवशीं माझिनी आपल्या आईबरोबर शहरांतील रस्त्यानें तिचा हात धरून चालला होता. जातां जातां त्याला वाटेंत एक देऊळ लागलें. त्याच्या पायरीवर एक अगदीं कंगाल म्हातारा मनुष्य बसला होता. त्याची ती दीनावस्था पाहून या चिमुकल्या

माझिनीचें अंतःकरण कळवळलें! आणि तो त्याजकडे पाहात तटस्थ उभा राहिला. आपला मुलगा म्हाताऱ्याला पाहून भ्याला असावा असें तिला वाटलें. पण इतक्यांत माझिनी तिचा हात सोडून त्या म्हाताऱ्याकडे धांवत गेला आणि त्याच्या गळ्याला विळखा घालून आपल्या आईकडे पाहात म्हणाला, "आई आई, या गरिबाला कांहीं तरी दे ग!"

माझिनीचा हा कनवाळूपणा पाहून त्याच्या आईस मोठें समाधान वाटलें! तो म्हातारा मनुष्य तर अगदीं सद्गदित झाला. त्याच्या डोळ्यांत प्रेमाश्रु आले! तो त्याच्या आईला म्हणाला, "बाईसाहेब, तुमचा हा मुलगा फार थोर मनाचा आहे. ममतेनें याचें नीट संगोपन करा. हा पुढें फार थोर पुरुष होईल आणि ह्याच्या हातून सर्व लोकांवर मोठे उपकार होतील." हें त्या वृद्ध गृहस्थाचें भविष्य पुढें अक्षरशः खरें झालें! कारण आपलें सर्व आयुष्य त्यानें आपल्या देशबांधवांकरितांच खर्च केलें.

---

# शिक्षणाची आवड.

## राजा राममोहन राय.

[ बंगाल्यांतील समाजसुधारक. ब्राह्मधर्म नांवाच्या ईश्वरी पंथाचे मूळ उत्पादक ]

राममोहनास अगदीं लहान वयांत म्हणजे पांच सहा वर्षांच्या वयांतच ज्ञानसंपादनाची उत्कट इच्छा उत्पन्न झाली होती. आपण

थोर माणूस व्हावें, कांहींतरी चांगलें कृत्य करावें, असें त्याला वाटूं लागलें. विद्येची गोडी लागल्यामुळें आईबापास सोडून इतक्या लहान वयांतही तो आपल्या वडील भावाकडे जाऊन राहिला होता. पांच सहा वर्षांच्या मुलास आपल्या आईबापास सोडून दुसऱ्या गांवीं जाऊन राहाणें मुळींच आवडत नाहीं. परंतु आपला भाऊ जगमोहन याजकडे राहिल्यानें आपणास विद्याभ्यास करितां येईल असें पाहून तो खुषीनें त्याच्याकडे येऊन राहिला होता.

एके दिवशीं त्यास प्यावयास दिलेलें दूध तो पिईना. घरच्या मंडळींनें त्याची नानातऱ्हांनीं समजूत घातली. परंतु कांहीं केल्या तो आपला हट्ट सोडीना. शेवटीं हीं गोष्ट त्याच्या वडील भावाच्या कानावर गेली. तव्हां त्यानें जवळ येऊन म्हटलें, " तूं आपला हट्ट सोडून दूध पिणार नाहींस, तर तुला येथून घरीं आईकडे पाठवून देऊं. तेथें गेल्यावर मग तुला शाळेंत जातां येणार नाहीं व शिक्षणासही मुकावें लागेल. तुला शिकण्याची इच्छा असेल, तर हट्ट सोडून तें दूध पिऊन टाक." इतके शब्द कानीं पडतांच राममोहनानें आपला हट्ट सोडून दिला आणि चटकन् दुधाचा पेला उचलून तें दूध पिऊन टाकलें. माराची अगर दुसरी कोणतीही भीति न दाखवितां 'तुला शिक्षणास मुकावें लागेल' असें म्हटल्याबरोबर आपला हट्ट सोडून देणाऱ्या राममोहनास लहानपणीं शिक्षणाची आवड किती होती हें या गोष्टीवरून दिसून येतें.

---

# अपराधाची कबुली.

## जॉर्ज वाशिंग्टन.

[ अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचे अध्यक्ष व अमेरिकेस स्वातंत्र्य मिळवून देणारे वीर. ]

जॉर्ज वाशिंग्टन यांच्या आईला घोड्यांचा फार शोक होता. त्यामुळें चांगले चांगले घोडे ती बाळगित असे. एकदां तिनें एक नवीन सुंदर करड्या रंगाचें शिंगरूं विकत घेतलें होतें. हें शिंगरूं फारच सुंदर असल्यामुळें तिची त्याच्यावर फारच प्रीति असे. ती त्या चिमुकल्या शिंगरावर कोणासच बसूं देत नसे.

एके दिवशीं वाशिंग्टनचे कांहीं बालमित्र त्यांच्या घरीं जेवणास आले होते. जेवणखाण आटोपल्यावर सगळीं मुलें बाहेर खेळावयास गेलीं. बालस्वभावानुसार त्यांचे कांहीं खेळ झाल्यावर त्या मंडळीपैकीं कोणी एकानें त्या चिमुकल्या शिंगरावर बसून तेथल्या कुरणास प्रदक्षिणा घालून यावें अशी शक्कल काढली. ती सर्वांस पसंत पडून प्रत्येकजण तो प्रयत्न करून पाहूं लागला. कित्येकजणांना त्याच्यावर बसतां येईना. कित्येकजण त्यावर बसतांना पडले कित्येकजण त्यावर बसले, परंतु त्यांच्या हातून ठरल्याप्रमाणें प्रदक्षिणा पुरी झाली नाहीं. शेवटीं वाशिंग्टनवर पाळी आली. वाशिंग्टन घोड्यावर बसण्यांत मोठे पटाईत होते. आपल्या सोबत्यांपैकीं एकाच्याही हातून शिंगरावर बसून ठरल्याप्रमाणें फेरी करणें झालें नाहीं, तेव्हां साह-

जिकच आपल्या सोबत्यांस आपली हुशारी दाखवावी असें त्यांच्या मनांत येऊन ते चटकन् उडी मारून शिंगरावर बसले आणि ईर्षेच्या भरांत त्यांनीं त्या शिंगराला इतक्या जोरानें पिटाळलें कीं, ती फेरी पुरी होऊन तें शिंगरूं आलें आणि वाशिंग्टन त्याच्यावरून उतरतात न उतरतात तोंच तें पटकन् खालीं पडून तात्काळ मरण पावलें!

आपल्या खेळाचा असा चमत्कारिक परिणाम झालेला पाहून सगळीं मुलें घाबरलीं. आतां पुढें काय करावें, हें त्यांस सुचेना. आपल्या कडून होऊं नये ती गोष्ट झाली खरी, पण ती लपविण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून वाशिंग्टन ताबडतोब आपल्या आईकडे गेले आणि झालेली इत्थंभूत हकिकत त्यांनीं तिला सांगितली! आपलें अतिशय आवडतें शिंगरूं आपल्या मुलानें निर्दयपणानें मारून टाकल्याबद्दल वाशिंग्टनच्या आईला किती वाईट वाटलें असेल व मुलाचा किती राग आला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. दुसरी तिसरी बाई असती तर तिनें मुलाला आधीं यथेच्छ झोडपलें असतें! पण वाशिंग्टनच्या आईनें तसें कांहीं केलें नाहीं. आपल्या मुलानें लबाडी न करितां झालेला अन्याय आपल्याजवळ येऊन कबूल केला, याबद्दल तिला समाधान वाटलें आणि झालेल्या आगळिकीबद्दल तिनें त्याला क्षमा केली. 'बाबा माझ्यानें खोटें बोलवत नाहीं' असें म्हणणाऱ्या वाशिंग्टनचीच ही दुसरी गोष्ट आहे. त्यावरून बालपणींच खरें बोलण्याची व अपराधाची कबुली करण्यांत टाळाटाळ न करण्याची त्यांना कशी संवय लागली होती हें स्पष्ट दिसून येतें.

# रस्त्यावरील दिव्याखालीं अभ्यास.

## श्रीधर गणेश जिन्सीवाले.

[ प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ. मुंबई येथील विल्सन कॉलेजांतील संस्कृताचे प्रोफेसर. ]

श्रीधर या नांवाचा एक गरीब विद्यार्थी अहमदनगरास विद्याभ्यासाकरितां येऊन राहिला होता. त्याचे वडील अतिशय वृद्ध झालेले असून त्यांना डोळ्यांनीं दिसतही नव्हतें. या वेळीं श्रीधराची इतकी गरिबी होती कीं, शाळेंत फी देण्यास पैसा नाहीं, अंगावर धड वस्त्र नाहीं, खावयास अन्न नाहीं व रात्रीं अभ्यास करीत बसण्यास दिवा नाहीं. इतकेंच नव्हे तर आपल्या वृद्ध व अंध वडिलांचें पोषण करण्याचा भारही त्याच्यावरच पडलेला होता. अल्पस्वल्प साह्य करण्यापुरताही कोणी आप्त नव्हता. परंतु अशाही बिकट परिस्थितींत विद्याभ्यास करण्यास तो डगमगला नाहीं. श्रीधरानें त्या अल्पवयांत माधुकरीची झोळी पतकरिली आणि आपल्या वडिलांचा व आपला उदरनिर्वाह तो चालवूं लागला. असलेल्या जुन्यापान्या कपड्यांवर कसे तरी दिवस ढकलावयाचे; उत्तम रीतीनें अभ्यास करून गुरुजींची मर्जी सुप्रसन्न राखावयाची व त्यांजकडून फीची माफी मिळवावयाची; ज्यांच्या घरीं राहावयाचें त्यांच्याच घरच्या दिव्याचा उपयोग करून रात्रीचा अभ्यास करावयाचा; तो दिवा नच मिळाल्यास रस्त्यावर म्युनिसिपालिटीच्या दिव्याजवळ

बसून अभ्यास करावयाचा; कोणतीही अडचण आली तरी तिला भ्यावयाचें नाहीं; अशा रीतीनें प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून त्यानें आपला विद्याभ्यास सुरू ठेविला होता.

एकदां असें झालें कीं, श्रीधर ज्यांच्या घरीं बिऱ्हाडास राहिला होता, त्या घरचीं सर्व माणसें कीर्तनास जाऊं लागलीं. तेव्हां आमच्याबरोबर कीर्तनास येतोस काय म्हणून त्यांनीं त्याला विचारलें. परंतु कांहीं अभ्यास करावयाचा असल्यामुळें त्यानें कीर्तनास जाण्याचें कबूल केलें नाहीं. त्यानें नाहीं म्हटल्याबरोबर विशेष आग्रह न करितां 'नसेल त्याच्या मनांतून येण्याचें' असें समजून घरांतला दिवा मालवून सर्व मंडळी कीर्तनास निघून गेली.

'माझा अभ्यास करावयाचा असल्यामुळें मी कीर्तनास येत नाहीं' असें जरी श्रीधरानें त्यांना सांगितलें नव्हतें, तरी ही मंडळी कीर्तनास निघून गेल्यावर आपण स्वस्थपणें अभ्यास करीत बसावें असा त्याचा बेत होता. घरांतील सगळी मंडळी कीर्तनास जावयाची असल्यामुळें जातांना त्यांनीं दिवा विझविला. मला अभ्यास करावयाचा आहे, तरी दिवा विझवूं नका, असें श्रीधरानें सांगितलें असतें, तर त्यांनीं दिवा विझविला नसता. परंतु त्यानें तसें कांहीं सांगितलें नाहीं. अभ्यास करावयाचा असल्यामुळें त्यानें कीर्तनास जाण्याचें नाकबूल केलें होतें, पण दिवाच विझवून मंडळी गेल्यामुळें अभ्यास करण्याची त्याला मोठी पंचाईत पडली! अभ्यास करण्यापुरता दिवाही आपणास मिळूं नये, याबद्दल त्याला किती वाईट वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे! पण दुःख करीत न बसतां पुढें काय करावें, या विचारास तो लागला.

इच्छा असली म्हणजे मार्ग सुचतो असें म्हणतात तें खोटें नाहीं. श्रीधर रहात असलेल्या बिऱ्हाडापासून थोड्या अंतरावर म्युनिसिपालिटीचा दिवा होता. त्या दिव्याच्या नजीक असलेल्या मशिदीच्या ओट्यावर त्या दिव्याचा चांगला प्रकाश पडला होता. तेथें जाऊन तो आपला अभ्यास करीत बसला! सुमारें अकरा सवा अकरा वाजतां कीर्तनास गेलेली मंडळी त्या रस्त्यानें परत जाऊं लागली. श्रीधर आपल्या अभ्यासांत इतका गढून गेला होता कीं, त्या मंडळी-कडे त्याचें मुळींच लक्ष गेलें नाहीं, आणि त्या मंडळीपैकींही कोणी त्याला पाहिलें नाहीं. पण या मंडळींतून वामनराव परांजपे नांवाचे त्याच्याच शाळेंतले एक मास्तर कीर्तनाहून परत चालले होते. त्यांची सहज तिकडे नजर गेली आणि त्यांनीं श्रीधराजवळ येऊन "इतक्या रात्रीं येथें कां बसला आहेस?" असें त्याला विचारलें. तेव्हां त्यानें घडलेला सारा खरा खरा प्रकार आपल्या गुरुजींस सविस्तर सांगितला. ती हकिकत ऐकून वामनरावांचें अंतःकरण कळवळलें! आणि ते म्हणाले, "श्रीधर तूं आपल्या वडिलांना विचारून उद्यां-पासून आमच्या घरीं अभ्यास करण्यास येत जा. मी तुला तुझ्या अभ्यासाकरितां स्वतंत्र दिवा देईन, आणि तुझ्या अभ्यासांत तुला जें कांहीं अडेल, तें मोठ्या खुषीनें समजावून देत जाईन." अना-यासें वामनरावाकडे अशी अभ्यासाची सोय झाल्यामुळें श्रीधराला किती आनंद झाला असेल बरें? दुसऱ्या दिवसापासूनच त्यानें वाम-नरावांकडे बिऱ्हाड करून आपल्या अभ्यासाची सोय करून घेतली. वामनरावांचें त्याच्यावर पोटच्या मुलाप्रमाणें प्रेम जडून ते त्याला अत्यंत कळकळीनें शिकवूं लागले. श्रीधराचें वय यावेळीं अवघें बारा

तेरा वर्षांचें असून तो इंग्रजी पांचव्या इयत्तेंत होता. ज्याला अभ्यास करण्यास दिवाही न मिळाल्यामुळें म्युनिसिपालिटीच्या दिव्याखालीं अभ्यास करण्याची पाळी आली होती असा दरिद्री विद्यार्थी अ-पल्या हिंमतीवर एम. ए. पर्यंत अभ्यास करून संस्कृतचा नामांकित प्रोफेसर होईल असें कोणास वाटेल काय? परंतु या गोष्टींतील विद्या-र्थ्यानें तें खरें करून दाखविलें तें कशाच्या जोरावर बरें? नशि-बाच्या? छे छे! उद्योगाच्या जोरावर.

---

# परनिंदेचें पाप.

## शेख सादी.

[ नामांकित आणि लोकप्रिय फारसी कवि. ]

आपल्या लोकांचें पवित्र क्षेत्र काशी येथें ज्याप्रमाणें आपल्या धर्मांतले पुष्कळ धार्मिक लोक यात्रेसाठीं जातात, त्याप्रमाणें मुसल-मान लोकांचें पवित्र क्षेत्र मक्का हें असून तेथें पुष्कळ मुसलमान या-त्रेकरू यात्रेसाठीं जातात. शेख सादी नांवाचा एक प्रसिद्ध मुसलमान कवि होऊन गेला. तो लहानपणीं आपल्या बापाबरोबर मक्केच्या या-त्रेस गेला होता.

सादी आणि त्याचा बाप हे एका यात्रेकरूच्या टोळीबरोबर म-क्केस जाण्यास निघाले होते. मुसलमान लोक मूर्तिपूजा करीत नाहींत.

तथापि ईश्वराची प्रार्थना करण्याचें (निमाज पढण्याचें) काम बहुधा वेळच्यावेळीं करीत असतात. त्यांच्या प्रार्थनेच्या इतर वेळांप्रमाणें मध्यरात्रीं उठून निमाज पढण्याची एक वेळ त्यांच्या धर्मशास्त्रांत सांगितलेली आहे. त्याप्रमाणें यात्रेस जातांना एके रात्रीं सादी व त्याचा बाप हे वेळेवर निमाज पढूं लागले. त्यांच्याबरोबरच्या मंडळींपैकीं कांहींजण जागे होऊन निमाज पढूं लागले, परंतु त्यांपैकीं कांहीं लोक स्वस्थ घोरत पडले होते.

या आळशी लोकांप्रमाणें आपण घोरत न पडतां वेळीं उठून निमाज पढण्याचें काम केलें, अशी सादी आपल्या पोर स्वभावाप्रमाणें फुशारकी मारूं लागला. त्याच्यानें उगी राहवेना. तो आपल्या बापास म्हणाला, " बाबा, बाबा, पहा हे लोक किती तरी आळशी आणि नादान आहेत ते! हे यात्रेसाठीं निघाले आहेत आणि वेळीं निमाज पढण्याचें कामही यांच्याकडून होत नाहीं! " त्याचें भाषण ऐकून त्याच्या बापानें उत्तर केलें, " बेटा, तूं निमाज न पढतां, त्या लोकांसारखा स्वस्थ घोरत पडला असतास, तरी उत्तम झालें असतें! कारण दुसऱ्याची निंदा करण्यापेक्षां एकवेळ स्वतः निमाज न पढल्यास चालेल! निमाज पढून तूं जें पुण्य जोडलेंस त्याहून फार मोठें पाप तूं निमाज न पढणाऱ्यांची निंदा करून कमावलेंस! " सादीच्या बापाचें म्हणणें किती अर्थपूर्ण आहे बरें?

---

# भुताचें ढोंग.

## रामचंद्र विठोबा धामणसकर.

[ बडादें संस्थानचे दिवाण. ]

रामचंद्र विठोबा ऊर्फ भाऊसाहेब धामणसकर हे आपल्या कर्तबगारीवर बडोद्याचे दिवाण झाले. परंतु त्यांच्या बालपणची एक गोष्ट मोठी मौजेची आहे. त्यांचे वडील रत्नागिरीस नोकरीस होते. त्यामुळें त्यांचें बालपण तेथेंच गेलें. ते सुमारें पांच वर्षांचे असतां त्यांच्या आईबापांनीं त्यांना शाळेंत घातलें. त्या वेळच्या शाळा आतांच्या सारख्या आनंददायक नसून शिक्षकही अतिशय मारणारे असत. त्यामुळें त्या अल्पवयांत त्यांस शाळेची गोडी न लागतां कंटाळा वाटूं लागला. म्हणून ते शाळा चुकविण्याची युक्ति करूं लागले. नेमानें शाळेंत न जातां, कोणतें ना कोणतें ढोंग करून शाळा चुकवावी, असें त्यांना वाटूं लागलें. सकाळीं उठून शाळेंत जाण्याच्या वेळीं आपल्या आंगांत भूत संचारल्याचें ढोंग ते करीत असत, आणि शाळेंत जाणें टाळीत असत.

अद्यापिही पुष्कळ लोकांचा भूत पिशाच्चावर बराच भरंवसा आहे. भाऊसाहेबांच्या काळीं तर या गोष्टीवर लोकांचा पक्का भरंवसा असे. त्याप्रमाणें त्यांच्या आईबापांना ती गोष्ट अगदीं खरी वाटली. भाऊसाहेबांचें ढोंग त्यांच्या लक्षांत न येतां आपल्या मुलाला पिशाच्चानें पछाडलें आहे अशीच त्यांची समजूत झाली, आणि हें भूत काढण्याचा उपाय करण्याची खटपट त्यांनीं चालविली.

आपल्याला पिशाच्चाचे मंत्र तंत्र येतात, आपणास भूत काढतां येतें, वगैरे थापा मारून भोळ्या भाबड्या लोकांस फसविणारे पंचाक्षरी कितीतरी आढळून येतात. अशाच एका पंचाक्षऱ्यानें भाऊसाहेबांच्या वडिलांस गांठून मी तुमच्या मुलावरचें भूत काढून टाकितों असें सांगून तो त्यांच्या घरीं आला. धूप, दीप, शेंदूर, लिंबें वगैरे बऱ्याच वस्तु घेऊन व तोंडानें नाना तऱ्हेचे मंत्र उच्चारून आपण भूत काढून टाकतों आहों असें त्यानें भासविलें. परंतु त्याच्या त्या कृतीचा यत्किंचित्‌ही उपयोग न होतां, भाऊसाहेबांचें भूत आपलें दुसरे दिवशीं हजरच!

आपण केलेली खटपट फुकट गेली, भूत कांहीं आपल्या मंत्रानें गेलें नाहीं, आपल्या धंद्यास हा अगदीं कमीपणा आहे, अशानें लोकांचा आपल्यावर भरंवसा बसणार नाहीं व आपली तुंबडी भरणार नाहीं, असें मनांत आणून त्या पंचाक्षरीबुवानें राक्षसी मंत्राची योजना भाऊसाहेबांवर केली! त्यानें मिरच्यांची धुरी त्यांना दिली. मिरच्यांची धुरी मिळतांच हें भूत पळून जाणारच अशी पंचाक्षऱ्यास खात्री होती. परंतु भाऊसाहेब कसले वस्ताद! त्यांनीं तें दुःखही मोठ्या निग्रहानें सोसिलें!

शाळेच्या धाकानें लहानपणीं भुताचें ढोंग करणाऱ्या भाऊसाहेबांनाच पुढें विद्येची गोडी लागून त्यांनीं विद्या संपादन केली आणि त्याच विद्वत्तेमुळें ते बडोदें संस्थानचे दिवाण झाले.

# तूं फारच चांगला मुलगा आहेस !

## बेंजामिन फ्रांक्लिन.

[ अमेरिकेंतील प्रसिद्ध मुत्सद्दी व ग्रंथकार. ]

बेंजामिन फ्रांक्लिन हा लहानपणीं फिलाडेल्फिया येथील शाळेंत जात असे. एके दिवशीं नेहमींप्रमाणें तो शाळेंत जात असतां वाटेवर असलेल्या लोहाराच्या दुकानाकडे त्याची दृष्टि गेली. लोहाराचें काम पाहून त्याला मोठी गंमत वाटली आणि तो त्याचें काम पाहत क्षणभर तेथें उभा राहिला. लोहार यावेळीं आपल्या हत्यारास धार देण्याचें काम करीत होता. त्याची नजर बेंजामिनकडे गेली. हा मुलगा आपलें काम पाहाण्यांत अगदीं गुंग होऊन गेला आहे, असें पाहून त्यानें त्याला आपल्या दुकानांत येण्याविषयीं सांगितलें. बेंजामिन मोठ्या आनंदानें त्याच्या दुकानांत जाऊन गंमत पाहूं लागला.

लोहार पक्का स्वार्थसाधु असून मोठा गोडबोल्या होता. त्याचा नोकर या वेळीं बाहेर कांहीं कामासाठीं गेला असून त्याच्या दुकानांतील चाक फिरविण्याला कोणीतरी मनुष्य पाहिजे होता. हा मुलगा आयता आपल्या तावडींत सांपडला आहे, असें पाहून लोहारानें त्याच्याशीं गोड गोड बोलण्यास सुरवात केली. तो त्याची तारीफ करून म्हणाला, “ वा: तूं फार चांगला मुलगा आहेस. तूं मोठा हुशार दिसतोस. तुला माझें हें चाक सहज फिरवितां येईल.

फिरवशील कां बाळा हें?" बेंजामिन त्या लोहाराच्या गोड गोड थापांस इतका भुलून गेला कीं, आपणास शाळेंत जावयाचें आहे, या गोष्टीची त्याला आठवणही राहिली नाहीं! लोहारानें सांगण्याचा अवकाश, तों त्यानें चाक फिरविण्यास सुरवात केली.

लोहाराचें आयतेंच काम झालें. त्यानें या मुलाकडून चाक फिरवून आपल्या बऱ्याच हत्यारांना धार देण्याचें काम आटपून घेतलें. बराच वेळ काम केल्यामुळें बेंजामिन अगदीं दमून गेला. इतक्यांत एकाएकीं त्याला शाळेची आठवण झाली! शाळेंत जाण्याचें सोडून आपण येथें उगीच वेळ घालविला, असें मनांत येऊन तो लगबगीनें शाळेंत जाण्यास निघाला.

बेंजामिनकडून त्या लोहारानें आपलें बरेंच काम करून घेतलें होतें. तथापि आणखी थोडेंसें काम व्हावयाचें होतें, तेव्हां हा फुकटचा नोकर हातचा सोडून देणें बरें नाहीं, असें मनांत आणून लोहारानें त्याला पुन्हा चण्याच्या झाडावर चढविण्यास सुरवात केली. तो म्हणाला, "काय अभ्यास? तुझ्यासारख्या हुशार मुलाला अभ्यासाची काय पर्वा? बाकीचीं मुलें तीन तासांत जो अभ्यास करीत नसतील, तेवढा अभ्यास तूं सहज एका तासांत करून टाकशील. तुझ्यासारख्या हुशार आणि गुणी मुलाला मास्तर कधींच छडी लावणार नाहींत. बाकीच्या उनाड पोरांसारखा तूं मास्तराचा मार खाणार नाहींस. तुझ्यासारख्या गुणी मुलाला एकादे दिवशीं शाळेंत जाण्यास थोडासा उशीर झाला म्हणून मास्तर मुळींच रागावणार नाहींत." लोहारानें अशी स्तुति केल्याबरोबर बेंजामिन

चढून गेला आणि त्यानें लोहाराचें सर्व काम करून दिलें! तें काम आटोपल्यानंतर तो शाळेंत गेला.

लोहाराच्या नादानें आपण शाळेचा किती वेळ फुकट घालविला हें बेंजामिनला तेथें समजलें नाहीं. परंतु तो शाळेंत गेला तेव्हां आपणास किती उशीर झाला हें त्याला कळून आलें. शाळेंत येण्यास दोन तास उशीर झाल्याबद्दल मास्तरांनीं त्याला चांगला चोप दिला. आधींच काम करून त्याचें आंग दुखत होतें, त्यांतच मास्तरांच्या माराची भर पडली! मास्तरांचा मार खावा लागला, मुलांनीं हसून टर उडविली, दोन तासांचा अभ्यास बुडाला, एकंदरींत चोहींकडून त्या दिवशीं त्याची फटफजितीच झाली. एवढें सगळें त्या कार्यसाधु लोहाराच्या थापांना भुलून चढून गेल्यामुळें झालें. ही गोष्ट बेंजामिन आजन्मांत कधींही विसरला नाहीं! कोणी केव्हांही त्याची स्तुति करूं लागला असतां लागलेंच त्याच्या मनांत येई कीं, ह्याला त्या लुच्च्या लोहाराप्रमाणें आपला कांहीं तरी स्वार्थ साधावयाचा असेल म्हणून हा माझी स्तुति करूं लागला आहे. लहानपणच्या या गोष्टीचें पक्कें स्मरण राहिल्यामुळें तो मोठेपणीं कधींही कोणाच्या तोंडपुजेपणाच्या जाळ्यांत सांपडला नाहीं!

# सद्गुणांची आवड.

## श्रीदेवी अहिल्याबाई होळकर.

[ मल्हारराव होळकर यांची सून. इंदूरची सुप्रसिद्ध दानशूर राणी. ]

अहिल्याबाईला पांचवें वर्ष लागल्यापासूनच तिच्या ठिकाणीं पुढील वयांत ज्या लोकोत्तर गुणांमुळें तिची दिगंत किर्ति झाली त्यांचे अंकुर थोडथोडे दिसूं लागले. आपल्या समवयस्क मुलींबरोबर ती अत्यंत प्रेमानें वागे. आपणास एकादा पदार्थ खाण्याकरितां कोणाकडून मिळाला, तर त्यांतील कांहीं अंश आपल्या मैत्रिणींस दिल्यावांचून तिनें कधीं खाल्लाच नाहीं. कोणतीही खाऊची वस्तु आपण एकलकोंड्यासारखी खाणें तिला मुळींच अवडत नसे. ती वस्तु खाण्यांत आपल्याला जो आनंद व्हावयाचा त्याहूनही अधिक आनंद आपल्या बरोबरच्या मुलींना ती वस्तु मिळाल्यानें तिला होत असे.

लहानपणीं मुली भातुकली खेळतात, फुगड्या घालतात व असेच दुसरे कांहीं खेळ खेळतात, पण अहिल्याबाईचा अतिशय आवडता खेळ म्हटला म्हणजे एकादा चांगलासा धोंडा मांडून त्याला देव समजून अत्यंत भक्तिभावानें त्याची पूजाअर्चा करणें हा असे. देवाला गंध फुलें वाहणें, त्याला नैवेद्य दाखविणें, मनोभावानें त्याची प्रार्थना करणें ह्या गोष्टी ती अगदीं अल्पवयांत इतक्या आवडीनें व पूज्यभावानें करीत असे कीं, कोणालाही तिची ती भक्ति पाहून नवलच वाटावें!

लहानपणापासूनच सत्यावर तिची अत्यंत श्रद्धा असे. ती कोणाशींही खोटें भाषण करीत नसे. तिच्याशीं कोणी खोटें भाषण केलें असतां तिला त्याचा तिटकारा येई. खोटें बोलणाराबरोबर ती भाषणही करीत नसे.

अहिल्याबाईच्या काळीं आतांच्यासारख्या गांवोगांव शाळा नव्हत्या व आतांच्यासारखा शिक्षणप्रसार झालेला नव्हता. तथापि तिच्या बापाच्या घराशेजारीं एका पंतोजीनें शाळा घातली होती. त्याचा व अहिल्याबाईच्या बापाचा घरोबा होता. त्याला मूलबाळ नव्हतें. अहिल्येसारखी सुशील मुलगी पाहून त्याचें तिच्यावर पोटच्या पोरीपेक्षां अधिक प्रेम बसलें. त्यानें तिला कळकळीनें लिहायला वाचायला शिकविलें व तीही तें मोठ्या आवडीनें शिकली. भारत, रामायण वगैरे ग्रंथांतील गोष्टी तिला अतिशय आवडत असत. लहानपणीं तिनें त्या आपल्या पंतोजीच्या तोंडून ऐकल्या होत्या व पुढें ती स्वतां वाचून पाही. पुराणांतील व देवादिकांच्या गोष्टी ऐकत असतां, ती अगदीं तन्मय होऊन जाई.

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात या म्हणीप्रमाणें ज्या थोर गुणांमुळें अहिल्याबाईचा लौकिक आज सर्व जगांत गाजत आहे ते सद्गुण अगदीं लहानपणींच तिच्या अंगीं दिसूं लागले होते असें वर दिलेल्या एकंदर हकिकतीवरून स्पष्ट दिसून येतें. अहिल्याबाईसारखी देवभक्ति, सत्याची आवड, सोयऱ्यांविषयीं प्रेम आणि सद्ग्रंथांचें वाचन व मनन हे गुण लहानपणापासूनच मुलांच्या अंगांत बिंबले तर पुढील आयुष्यांत देवी अहिल्याबाईप्रमाणें त्यांचा बोलबाला झाल्यावांचून राहाणार नाहीं. मात्र पहिल्यापासूनच चांगल्या गोष्टीची आवड धरली पाहिजे. चांगली असो कीं वाईट असो ज्या गोष्टीची आवड लहानपणीं लागेल तीच गोष्ट मोठेपणीं आपल्यांत दिसेल.

# मनाची एकाग्रता.

## डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर.

[ जगद्विख्यात संस्कृत पंडित. ]

रामकृष्णपंत हे ल्हानपणीं इंग्रजी शिकण्याकरितां रत्नागिरीस येऊन राहिले होते. त्यावेळीं त्यांची अभ्यास करण्याची-विशेषतः पाठ विषय तयार करण्याची पद्धति जरा निराळ्या प्रकारची होती. पुष्कळ मुलें एके ठिकाणीं बसून पाठ करण्याचा विषय तयार करीत असतात. पण रामकृष्णपंत हे एके ठिकाणीं बसून न राहातां, पाठ करण्याचा विषय तोंडानें मोठ्यानें म्हणत व बाहेरच्या पडवींत इकडून तिकडे झपाट्यानें फिरत फिरत अभ्यास करीत असत त्यावेळीं अभ्यासावांचून त्यांचें दुसरीकडे मुळींच लक्ष जात नसे.

लंगोटी घातलेला एक मुलगा तोंडानें मोठमोठ्यानें बडबडत पडवींतून फिरतो आहे, कोण आला, कोण गेला याची त्याला शुद्ध नाहीं, असें पाहून गवताच्या वरंडी विकावयास येणाऱ्या कुणब्याच्या अडाणी बायकांस वाटावयाचें कीं, हा मुलगा खास वेडा झाला आहे ! त्या घरांतल्या मंडळीस विचारीत आणि म्हणत कीं, " हा मुलगा असें कां करितो ? ह्याला काय झालें आहे ? ह्याला वेडबीड तर लागलें नाहीं ना ? " मुलाच्या वेडाची कल्पना त्या बिचाऱ्या अडाणी बायकांस कशी होणार ?

रामकृष्णपंत रत्नागिरीहून मुंबईस विद्याभ्यासाकरितां येऊन राहिले. त्यावेळीं ते प्रथम आपल्या बहिणीच्या बिऱ्हाडीं राहिले होते.

एकदां ते आपला अभ्यास करीत बसले असतां, एक लहान रांग मूल त्यांच्याजवळ कोणीसें आणून सोडलें. मूल तेथें सोडून जाणारा हेतु इतकाच होता कीं, " हा मुलगा येथें अभ्यास करीत ब आहे, तो मुलाकडे लक्ष देईल आणि तें पडलें सवरलें तर त्याला लील." परंतु रामकृष्णपंत आपल्या अभ्यासांत गुंग होऊन गेले हो आपल्याजवळ कोणीं लहान मूल आणून सोडलें आहे याची त्यांन मुळींच दाद लागली नाहीं. तें मूल रांगतां रांगतां पडून मोठ्यान रडूं लागलें, तेव्हां आंतून मुलाची आई धांवत आली. जवळ रामकृष्ण पंत अभ्यास करीत बसलेले असून मूल किंचाळत आहे, त्याजकडे त्यांचें लक्ष नाहीं, ते आपल्या अभ्यासांतच दंग आहेत, असें पाहून त्यां बाईनें मुलाला चटकन् उचलून घेऊन रामकृष्णपंतांच्या या व नाबद्दल तिटकारा दाखविला ! तो त्यांना मुळींच सहन झाला नाहीं मुलाला सांभाळण्याबद्दल आपणास सांगितलें नव्हतें, अभ्यास क पूर्ण लक्ष असल्यामुळें मुलाकडे दुर्लक्ष होणें साहजिक आहे, अ असतां आपणावर हा बोल कां यावा असें म्हणून तावडतोब त्यांनीं आपलें बिऱ्हाड बदलून आपल्या जेवणाची सोय खाणावळींत करून घेतली.

अभ्यास असो किंवा दुसरें कोणतेंही काम असो, त्यांत मनाची एकाग्रता झाली तर तो अभ्यास अगर तें काम उत्कृष्ट हो लहानपणीं अभ्यासांत ज्यांच्या मनाची इतकी एकाग्रता होत हो त्यांनी जगद्विख्यात विद्वान् म्हणून मोठेपणीं नांव मिळविलें यां नवल तें कोणतें ?